महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, सर्व्हे नं.१५६०/१
आडगांव शिवार,आडगांव नाशिक–४२२००३
Website-sscboardnashik.com

Maharashtra State
Secondary & Higher Secondary Education,
Nashik Divisional Board, Serve No.1560/1
Adgaon Shivar, Adgaon, Nashik-422003.
Email-nsksec@rediffmail.com

महत्वाचे / तात्काळ
परीक्षाप्राधान्य,

क्रमांक / ना.वि.मं / माध्य / खा.वि / 2529
नाशिक: ४२२००३
दिनांक:– 09/१०/२०२३

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा.
(नाशिक, धुळे, जळगांव व नंदुरबार)

विषय :–माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा खाजगी विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या स्वाध्याय पुस्तिका मंडळ संकेतस्थळावर पी.डी.एफ. (**pdf**) स्वरूपात उपलब्ध करून देण्याबाबत....

संदर्भ:– १) राज्यमंडळाचे क्र.रा.मं./परीक्षा–३/४३७० दि.०४/१०/२०२३ रोजीचे पत्र.....
२) या कार्यालयाचे क्रमांक/ना.वि.मं/माध्य/खा.वि/१९२३ दि.१०/०८/२०२३ रोजीचे पत्र..

उपरोक्त संदर्भिय विषयांस अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी थेट अर्ज योजना ही सुलभ व विद्यार्थी केंद्रीत व्हावी या दृष्टीने सध्याची संपर्क केंद्रामार्फत नांवनोंदणी करण्याची कार्यपध्दती बंद करून, खाजगी विद्यार्थी नांव नोंदणी अर्ज सर्व मान्यताप्राप्त शाळांमधून स्विकारण्याची कार्यपध्दती मार्च २०२४ च्या परीक्षेपासून निश्चित करण्यात आलेली आहे. इ.१० वी खाजगी विद्यार्थ्यांसाठी लागणाऱ्या स्वाध्याय पुस्तिका मार्च २०२४ परीक्षेपासून मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याबाबत उपरोक्त संदर्भ क्र.०२ अन्वये कळविण्यात आले आहे.

या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना व्दितीय भाषा (इंग्रजी/मराठी), गणित, समाजशास्त्र या विषयांच्या स्वाध्याय पुस्तिका ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या खाली दिलेल्या संकेतस्थळावर दिनांक ०४/१०/२०२३ पासून इंग्रजी, मराठी, हिंदी व उर्दू अशा चार माध्यमांमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहे.

१) **http://form17.mh-ssc.ac.in**
२) **http://mahahsscboard.in**

| अ.क्र | विषय | माध्यम |
|---|---|---|
| १ | मराठी (व्दितीय/तृतीय) | मराठी |
| २ | इंग्रजी (व्दितीय/तृतीय) | इंग्रजी |
| ३ | गणित भाग १ व २ | मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू |
| ४ | इतिहास–राज्यशास्त्र | मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू |
| ५ | भूगोल | मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू |

तसेच विज्ञान या विषयासाठी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक परीक्षा असल्याने सदर विषयासाठी स्वाध्याय पुस्तिका राहणार नाही.

सदर स्वाध्याय पुस्तिका विद्यार्थ्यांना फक्त सरावासाठी देण्यात याव्यात. तसेच मान्यताप्राप्त शाळांनी खाजगी विद्यार्थ्यांची नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे तोंडी, अंतर्गत मुल्यमापन, प्रात्यक्षिक व श्रेणी विषयांची परीक्षा घेऊन सदर परीक्षांचे गुण विहित मुदतीत मंडळाकडे सादर करणे अनिवार्य आहे. तसेच नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे सर्व रेकॉर्ड व स्वतंत्र जनरल रजिस्टर आपल्या शाळेच्या दप्तरी जतन करून ठेवण्यात यावे. याची सर्व शाळा प्रमुखांनी नोंद घ्यावी.

(डॉ.मच्छिंद्रनाथ कदम)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक–४२२००३